# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery Of Stolen Property**

**Police Station** :- **Manora**

**Date of Good Work done** :- **06/04/2022**

**Brief of the work done :-**

धामणी मानोरा येथील शेतकऱ्याच्या तूर चोरी प्रकरणातील आरोपीस मानोरा पोलिसांनी जेरबंद केले असून आरोपीचे ताब्यातून तुरीचे 14 हजार रुपये जप्त केले आहे.

## क्राइम-न्यायालयातून

# तुर चोरी प्रकरणातील आरोपीला केले जेरबंद

देशोन्नती वृत्तसंकलन...



**मानोरा** ■ ट्रॅक्टर ट्रॉली मधून तूर चोरी करणारा चोरटा वैभव गोपाल राठोड रा.सोमनाथ नगर याला ५ एप्रिल रोजी मानोरा पोलिसांनी जेरबंद केले. फिर्यादी दीपक बाबाराव पाटील रां. धामणी मानोरा यांच्या माहीती

पोलीस सूत्रा कडून प्राप्त माहिती वरून असे की, धामणी मानोरा येथील शेतकरी दीपक बाबाराव पाटील यांनी आपल्या शेतातील तूरी चे कट्टे हेमेंद्र पाटील यांचे पेट्रोल पंप परिसरात ठेवले होते. दिनांक २६फेब्रुवारी रोजी रात्री आरोपी याने ट्रॅक्टर ट्रॉली मधे ठेवलेल्या २५ कट्या मधून १४ कट्टे चोरून नेले. फिर्यादीच्या तक्रारी वरून मानोरा पोलिसांनी तपास केला असता व सिसी टिव्ही फुटेज मधे आरोपी तूर चोरून नेल्याचे दिसून आले.

सदर घटनेपासुन आरोपी फरार होता. गुप्त माहितीच्या आधारे पोलीसांना गुंगारा देणाऱ्या आरोपीस ५ एप्रिल रोजी मानोरा ठाणेदार सुनील जाधव यांचे मार्गदर्शनाखाली जमादार जगन्नाथ घाटे, प्रवीण गव्हांदे, महादेव पायघन यांनी जेरबंद केले. व त्याचेकडून १४ हजार रुपये जप्त केले. आरोपीस कोर्टा समोर हजर केले. (श.प्र.)